महाराष्ट्र शासन
सहसंचालक
उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१

www.jdhemumbai.gov.in E-mail- jdhemumbai@gmail.com Tel & Fax No. ०२२ २२६५६६००, २२६९१५२८

क्र.ससं/उशि/मुंवि/प्रमाणपत्र/२०२०-२१/ 55 दिनांक - 14/01/2021

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय क्र. एनजीसी २०१८/(३२२/१८)/मशि-४ दि. ०४.०३.२०२० अन्वये **बॉम्बे सब-अर्बन आर्ट्स एन्ड क्राफ्ट एज्यूकेशन सोसायटीचे एल. एस. रहेजा स्कूल ऑफ आर्किटेक्चर, बांद्रा (पूर्व) मुंबई ५१.** या महाविद्यालयास शासन आदेशामधील अटी व शर्तीना अनुसरून पदवी/पदव्युत्तर स्तरावर **B.Voc.(Interior Design)** या अभ्यासक्रमास पुर्वलक्षी प्रभावाने उपरोक्त शासन मंजूरी आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून **कायम विना अनुदानित तत्वावर** सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. शासन आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था/महाविद्यालयाकडून रू.१००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर उपरोक्त नवीन विद्याशाखा चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही स्वरूपातील अनुदानाची मागणी केली जाणार नाही, असे हमीपत्र महाविद्यालयाकडून/संस्थेकडून शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

प्रचलित महाराष्ट्र विद्यापीट कायद्या अंतर्गत तरतूदीनुसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश, नियतकालिक आढावा, नॅक मूल्यांकनाबाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीट अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यास तसेच शासन आदेशातील मार्गदर्शक सूचना व प्रचलित नियमांप्रमाणे विद्यापीठाने या महाविद्यालयास उपरोक्त उल्लेखित नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरिक्त तुकडी यांना संलग्नीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यास हरकत नाही.

स्थळ- मुंबई - ४०००0१

सहसंचालक
उच्च शिक्षण,मुंबई विभाग,मुंबई

दिनांक- १४.०१.२०२१

प्रत,

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीट, मुंबई-२०

तसेच कळविण्यात येते की, विद्यापीठांना त्यांच्या संलग्नीकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे/ विद्याशाखांचे विहीत शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरूपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबीची पूर्तता करण्याच्या सूचना तसेच युजीसी, बार कौन्सिल ऑफ इंडिया व एनसीटीई यांचे कडील नाहरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना संस्थेच्या/महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

शासन आदेशानुसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करून संलग्नीकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाटवावी. नियतकालिक आढाव्यात मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रम/विषयामध्ये मंजूर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी संख्या दिसून आल्यास सदर अतिरिक्त तुकडयांची मान्यता रद्द समजण्यात येईल व तसे आदेश काढले जातील.

L. S. RAHEJA SCHOOL OF ARCH. B. ARCH. BANDRA